पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

## प्रेस नोट

दिनांक :- १३/०९/२०२३

# वणी येथे किरकोळ भांडणातून मामाचा भाच्यानेच केला घात, दोघांना अटक

दिनांक ११/९/२०२३ रोजी रात्री उशीरा वणी पोलीस ठाणे हद्दीतील खेडले गावात संदीप हरी मेधने वय ४१ वर्ष, या अपंग इसमाचा मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत घराबाहेर पडला आहे, अशी माहिती वणी पोलीस स्टेशनला प्राप्त झाली होती.

सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर, वणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. निलेश बोडखे हे तातडीने घटनास्थळी रवाना झाले. सदर मयत हा आपल्या आईसह खेडले येथे राहत असल्याचे दिसून आले. मयताचे डोक्यात मारहाणीच्या जखमा दिसून आल्या तसेच अंगावर पेट्रोलजन्य पदार्थ टाकून त्यास जाळण्याचा प्रयत्न झाल्याने त्याचा कमरेचे वरील भाग ब-यापैकी जळून प्रेत विद्रूप झाले होते.

सदर घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे-केदार व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय बांबळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याचप्रमाणे श्वानपथक, ठसे तज्ञ व न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथील तज्ञांना देखील पाचारण करण्यात आले.

पोलीसांना घटनास्थळावर दारूच्या रिकाम्या दोन बाटल्या व एक पेट्रोलची कॅन अशा वस्तू आढळून आल्या. यावरून, मयताचे सोबत आणखी कोणीतरी दारू पिण्यासाठी आला असावा, अशी खुणगाट पोलीसांनी बांधली व याविषयी अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला असता, घटनेच्या दिवशी रात्री मयताचा भाचा किरण शरद कदम, वय २० वर्ष रा. कोराटे, तालुका दिंडोरी हा आणखी एका इसमासोबत आला होता, अशी माहिती मिळाली.

त्यानुसार, पोलीसांनी प्रथमता किरण शरद कदम यास त्याच्या राहते गावातून ताब्यात घेतले. त्यास बारकाईने विचारपूस करता त्याचे सोबत नामदेव रामदास वायकंडे, वय ३६ वर्ष, रा. कोराटे तालुका दिंडोरी हा देखील आला असल्याची कबुली त्याने दिली. घटनेच्या दिवशी दोघांनीही मयतासोबत दारू पिली. यादरम्यान मयत व किरण यांच्यात किरकोळ बाचाबाची झाली व यातूनच किरण याने चिडून कोयत्याने वार केले. मात्र कदाचित एवढ्याने मामा लवकर मरणार नाही असे वाटल्यावरुन, किरण याने सोबत आणलेल्या पेट्रोलच्या कॅनमधील काही पेट्रोल मयताचे अंगावर टाकून त्यास पेटवून दिले व उर्वरित पेट्रोल स्वत:चे गाडीत भरुन ते दोघेही घटनास्थळावरुन पसार झाले, अशी माहिती तपास दरम्यान पुढे येत आहे. यातील आरोपी किरण शरद कदम याचेविरूध्द दिंडोरी व वडनेर भैरव पोलीस ठाणेस चोरीचे गुन्हे देखील दाखल आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे-केदार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. संजय बांबळे यांनी केलेले मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे वणी पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. निलेश बोडखे, पोउनि व्ही.एस.कोठावळे, पोउनि महेश शिंदे, पोहवा धनंजय शिलावटे, पोना युवराज खांडवी, कुणाल मराठे, बंडू हेंगडे, श्रीकांत गारूंगे, पोकॉ सुनिल ठाकरे, रमेश चव्हाण, योगेश राठोड, प्रविण भोईर यांचे पथकाने वरील खूनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे.